# दिनांक 22/03/2025

**1.** नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/03/2025 रोजी 03:30 वा च्या सुमारास मौजे ऐनघर गावचे हददीत बीजली हॉटेल जवळ मुंबई-गोवा हायवे रोडवर, रोहा येथे अज्ञात आरोपीत याने त्याचे ताब्यातील डंपर नं एम एच-48/ए जी-9015 ही स्वत: चालवीत येवुन रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने बेदरकारपणे व भरधाव वेगाने चालवून रस्त्याचे बाजूला उभ्या असेलेल्या ट्रक नं एम एच-12/केपी-8027 हिस मागून ठोकर मारुन अपघात करुन दोन्ही वाहनांच्या नुकसानीस कारणीभूत झाला.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.30/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/सरोज सावंत ह्या करीत आहेत.

**2.** नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/03/2025 रोजी 09:40 वा च्या सुमारास मौजे आंबेघर गावचे पुढे वळणावर पेझारी ते नागोठणे रोडवर, रोहा येथे आरोपीत रा. भारतीय कमला नगर एस पी रोड अॅन्टॉप हिल मुंबई याने त्याचे ताब्यातील टट्रेलर नं. एम एच-46/सी यु-4099 हा रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन, अतिवेगात चालवून टट्रेलर मधील असलेले लोखंडी पिलर हे टट्रेलर च्या बाहेरील बाजूस असल्याने त्याने कोर्नरवर समोरून येणा-या एस टी बस नं. एम एच-20/बी एल-3706 हीस ठोकर मारून एस टी बसचे नुकसानीस कारणीभूत झाला.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.31/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास स.फौ. संदेश सानप हे करीत आहेत.

**3.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 18:00 वा ते दि. 03/03/2025 रोजी 18:00 वा च्या दरम्यान मौजे महालक्ष्मी बिल्डींग, दहिवली, ता.कर्जत, येथे आरोपीत रा.देउळवाडी अहमदनगर या महिला फिर्यादी रा.महारलक्ष्मी बिल्डींग,गुरव आळी, दहिवली , ता.कर्जत यांच्या घरी वास्तव्यास असताना फिर्यादी यांचे घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले एकूण 75,500/- रुपये व किंमतीचे दागीने व रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशीवाय स्वत:चे फायदया करीता चोरून नेले आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.84/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम

305(अ). प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/स्वप्नील येरुणकर हे करीत आहेत.

**4.** कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/03/2025 रोजी 21:30 वा च्या सुमारास मौजे पुगाव गावचे हद्दीत एचपी पेट्रोलपंपासमोर ता.रोहा येथे फिर्यादी रा. श्रीगणेश एकता सोसायटी बिल्डींग नं.02, रुम नं.602, यशवंत नगर गोरेगाव पश्चिम हे त्यांचे ताब्यातील इको गाडी क्र. एमएच 02सी.एल.5333 हि स्वत: गोवा मुंबई हायवे रोडने चालवित घेवुन मौजे पुगाव गावचे हद्दीत आलेवेळी एचपी पेट्रोलपंपामधुन ट्रेलर क्र एमएच 46 बी.एम.9400वरील आरोपित चालक रा. स्टीलवाला कंपाउंड, साईनाका कुर्ला मुंबई रा.स्टीलवाला कंपाउंड, साईनाका कुर्ला मुंबई हा त्याचे ताब्यातील ट्रेलर हा रस्त्याच्या परिस्थीतीकडे व येणा-या जाणा-या रोडवरील वाहनांकडे दुर्लक्ष करुन धोकादायक पध्दतीने चालवुन अचानक इको कारचे समोर आडवा येवुन अपघात करुन अपघातात फिर्यादी व फिर्यादीचे कुटुंबियांचे 1) मयुरेश दिनेश बारे 2) स्नेहदिपा दिनेश बारे 3) हर्ष किरण डावरे 4) सार्थक किरण डावरे पिडीत सर्व रा. .श्रीगणेश एकता सोसायटी बिल्डींग नं.02, रुम नं.602, यशवंत नगर गोरेगाव पश्चिम यांच्या लहानमोठया तसेच गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस व दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं.29/2025, भा.न्या.संहीता 2023 चे कलम 281, 125(1),125(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/श्रीराम मोरे हे करीत आहेत.

**5.** दिघी (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे कुडगाव उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन् येथे आरोपीत यांचकडे गरोदर महीलाची गर्भपात करण्यासंदर्भात कोणतेही वैदकीय अधिकार नसताना त्यानी कुडगाव येथे राहणारी महीला हीस गर्भपात होण्याच्या गोळयाचे सेवेन करणेबाबत सांगुन सदरच्या गोळया कोणत्यातरी मेडीकल स्टोअर्समधुन आणुन उपलब्ध करून दिले त्यामध्ये सदर महीलेचा गर्भपात करण्याच्या गोळयाचे सेवन केल्याने तिचे शरीरातुन अतिरिक्त रक्तस्व होवून तिची तब्येत बिघडुन तिचे जिवितास धोका निर्माण होणारी कृती केली व त्यातुन तिचा गर्भपात झाला.

याबाबत दिघी (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.19/2025, बी एन एस 2023 दुरूस्ती कायदा 2021 चे कलम 05 प्रमाणे 88 92 125 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/कुथे हे करीत आहेत.

**6.** वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/05/2024 रोजी 00:00 वा ते दि. 17/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान विधीसंघर्षग्रस्त बालक याने पिडीत मुलगी ही अल्पवयीन व लैंगिक सहमती देण्यास असक्षम असल्याची माहिती असताना देखिल विधीसंघर्षग्रस्त बालक याने पिडीत मुलगी हीचे सोबत वारंवार शरीरसंबंध केल्याने पिडीता ही 9 महिन्यांची गरोदर राहून तिची दिनांक 17.03.2025 रोजी सिव्हील हॉस्पीटल अलिबाग येथे प्रसुती होवून तिने एका मुलीस जन्म दिला.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे गुरनं. 30/2025 भा.दं.वि.क. 64 , BNS 64 (2) i, m , बाल लै. अत्या. संरक्षण (POCSO)अधिनियम, 2012 चे कलम 4,6 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/श्रीमती योगिता सांगळे हे करीत आहेत.

**7.** नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/10/2023 रोजी 00:00 वा ते दि. 10/08/2024 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा नागोठणे, रोहा येथे फिर्यादी रा लोणेरे, माणगाव यांची आरोपीत यांनी वेळोवेळी कमी किंमतीत सोन्याचे बिस्कीट देतो असे सांगून फिर्यादी यांच्या ऑनलाईन अकाउंटमधून पैसे टाकून घेवून फिर्यादीकडून आजपावेतो 67,50,000/- रू घेवून त्यापैकी 7,00,000/- रू परत केले व उर्वरीत 60,50,000/- रक्कम देण्यास टाळाटाळ करून आरोपीत याने संगणमत करून फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक करून फिर्यादी यांस दमदाटी करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.32/2025, भारतीय न्यायसंहिता अधिनियम 2023 चे कलम 318(2),351(2)(3),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री देवकते हे करीत आहेत.

**8.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/01/2015 रोजी 00:00 वा ते दि. 31/12/2022 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौज पनवेल विभागाअंतर्गत 220 के.व्ही.आपटा उपक्रेंद ता. पनवेल येथे फिर्यादी, रा. अक्षय को. ऑ.हौ. सोसायटी,प्लॉट नं.71 डी. रूम नं. 702 खारघर, नवी मुंबई हे महाराष्ट्र राज्य विदयूत पारेषन कंपनी मर्यादीत कंपनीमध्ये 220 के.व्ही. आपटा उपक्रेंदाचे अतिरीक्त कार्यकारी अभियंता आहेत. आरोपीत क्र 1 हे आपटा उपक्रेंदाचे तत्कालीन उप कार्यकारी अभियंता होते. आरोपीत क्र 2 याचे स्क्रॅपचे कॉनटॅक्ट आहे आरोपीत क्र.3 हे आरोपीत क्र.3 हे गून्हयात वापरलेले वाहनाचे चालक आहेत. अ.उ.दा. वाहीनी बांधकाम उपविभाग भिंगारी पनवेल व अ.उ.दा. वाहीनी बांधकाम उपविभाग खारघर यानी आपटा उपक्रेंदात 220 के.व्ही. वडखळ लाईन 220 वडखळ लाईनए 220 के.व्ही उरण खारघर लाईन या लाईनचे साठवणूक केलेले स्क्रॅप कंडक्टर असक 112.25 मेट्रिक टन वजनाचे एकूण 1,57,15000 रू किमतीचा माल आरोपीत क्र 1 याच्या आधिपत्याखाली साठवणूक करुन ठेवला असताना त्यांनी आपले लोकसेवक पदाचा दूरूपयोग करुन आरोपीत क्र 2 व 3 यांचे मदतीने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वर नमुद मालमत्तेची विल्हेवाट लावून संगनमताने अपहार करून महापारेषण कंपनीचे आर्थिक नूकसान करुन फसवणूक केली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं. 66/2025, भा.द.वि कलम 420,409,34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/ प्रमोद जाधव, हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 21.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 206 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,18,450/-रुपये इतका दंड आकारला आहे.